नि.फौ.ख.क्र.१०३/२०१८.
सरकार वि. भोजराज व इतर
निशाणी क्र.१७४.

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** - भुषण ललक्ष्मणराव राऊत
**वय** - ३३ वर्षे **व्यवसाय** - वनरक्षक,
**राहणार** - काटोल, तह.काटोल, जिल्हा नागपूर.

**<u>सरतपास सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री एम.आर.भांडेकर यांच्या तर्फे</u>**

**०१.** दिनांक ०५.०५.२०१८ रोजी मी वनरक्षक या पदावर उत्तर सलामा, पश्चीमी चिखलकारी बीट येथे कार्यरत होतो. उत्तर सलामा येथे कॉट्रसमध्य वायरलेस व्दारे संदेश मिळाला मॅग्जीन नाला -२ मध्ये वनखंड क्र.५२८ राखीव वनामध्ये नाल्याच्या किना-यावर अंदाजे २० ते २५ मछवारे हे मच्छी पकडण्याकरीता आलेले आहेत. मिळालेल्या संदेशानुसार एसटीपीएफचा स्टॉफ, सलामा येथील १२ कर्मचारी असे एकुण २० ते २५ जण असे आम्ही मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी मॅग्जीन नाला -२ येथे गेलो.

**०२.** तेथे गेल्यानंतर जवळपास २० ते २५ मछवारे मच्छी पकडण्याकरीता आलेले होते. वनअधिकारी यांनी आमच्यासमक्ष सर्वांना घेराबंदी करून २४ आरोपी यांना अटक केली. अटक करून त्यांच्याकडील साहीत्य एक चादर, तिन जर्मन गंज, एक नॅायलॉन दोर, चार मच्छी पकडण्याचे जाळे, तिन खाली डबक्या, अंदाजे ६ किला खंडा, तिन टीफीन डब्बे असा मुददेमाल जप्त केला.

**०३.** आता साक्षीदाराला जप्तीनामा नि.२७ व मोका पंचनामा नि.२९ दाखविला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी, श्री.देवकर साहेबांची सही व २४ आरोपींचे अंगठे व सहया आहेत.

**०४.** जप्त केलेला मुददेमाल हा पि.एम.खोरगडे यांचेकडे सुप्रुतनाम्यावर सुप्रुत केला. आता मला सुप्रुतनामा नि.२८ दाखविला. त्यावर माझी व खोरगडे यांची सही आहे.

त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**०५.** आता मला अटक पंचनामे नि.३० ते ५३ दाखविले. त्यावर माझी, आरोपीची सही व अंगठे तसेच देवकर साहेबांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबबर आहे.

**०६.** त्यानंतर वनअधिकारी यांनी माझे बयाण नोंदविले होते. आता मला दाखविण्यात आलेले माझे बयाण नि.१०३ तेच आहे. त्यावर माझी व साहेबांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**०७.** मी सर्व २४ आरोपीना पाहील्यास ओळखू शकतो. ते आज रोजी न्यायालयात हजर नाही. (सर्व आरोपीच्या वकीलांतर्फे नि.क्र.१७२ व १७३ वर आरोपी गैरहजेरीमाफीचा अर्ज ओळखीबाबत वाद नसल्याने मंजूर)

**<u>उलट तपासणी आरोपी क्र.१,४, ५, ७ ते ९,११,१३ ते १५,१७ ते १९ व २१ ते २३ करीता श्री ए.व्ही.गजभिये यांचेतर्फे</u>**

**०८.** दि.०५.०५.२०१८ रोजी सलामा येथे कार्यालयात एस.आर.पाटील, आकाश जेंगठे, एस.बी.केकान, पी.एम.खोरगडे, उईके वनरक्षक कामतवार वनरक्षक व विभुते वनरक्षक हे कार्यरत होते व बाकी ४-५ कर्मचा-यांचे व दोन तिन हंगामी लेबर होते त्यांची नाव आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मॅग्जीन नाला हा पाण्याचा भाग आहे. मी दि.२१.०६.२०१४ पासून सन २०१८ पर्यंत सदर भागात कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सलामा कार्यालयापासून मॅग्जीन नाला हा अंदाजे १७ ते १८ किमी अंतरावर आहे.

**०९.** हे म्हणणे खरे नाही की, मी वरील सर्व सहया एकाच वेळी पिपरीया कार्यालय येथे केल्या होत्या. मी बयाण देतांना असे सांगीतले होते की, दि.०५.०५.२०१८ रोजी उत्तर सलामा पश्चीम चिखलकारी बीट येथे कार्यरत होतो व उत्तर सलामा येथे कॉर्टरवर असतांना वॉयरलेस मॅसेज मिळाला होता व वनखंड क्र.५२८ राखीव वनात नाल्याच्या किनारी मासेमार आले आहेत असा मॅसेज मिळाला. मी बयाण देतांना असे सांगीतले होते की, आरोपींकडून एक चादर, तिन जर्मन गंज, एक नॉयलॉन दोर, चार मच्छी पकडण्याचे जाळे, तिन खाली डबक्या, अंदाजे ६ किलो

खंडा, तिन टीफीन डब्बे असा मुददेमाल जप्त केला व तो खोरगडे यांना सुप्रुतनाम्यावर दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, वरील सर्व बाबी माझ्या बयाणात नमुद नाही. सदर बाबी माझ्या बयाणात कां नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतले त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही व दि.०५.०५.२०१८ रोजी वायरलेसवर कोणताही तथाकथीत संदेश प्राप्त झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, एसटीएफ स्टॉफ व सलामा येथील १० ते १२ लोक असे आम्ही घटनास्थळी गेलो नाही व तेथे आम्हाला २० ते २५ मासेमार दिसले नाही व त्यांना तेथे पकडले नाही तसेच त्यांच्याकडून कोणतेही साहीत्य जप्त करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्या ठिकाणी नि.२७ व २९ वरील पंचनामे तयार केले होते व मुददेमाल सुप्रुतनामा नि.२८ वर खोरगडे यांना दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटया पंचनाम्यावर व खोटया तयार केलेल्या बयाणावर सहया केल्या होत्या.

**११.** दि.०५.०५.२०१८ रोजी मी सलामा येथे सकाळपासून होतो. त्या दिवशी आम्ही सायं.६.०० ते ९.०० च्या दरम्यान सलामा कार्यालयाच्या बाहेर होतो व रात्री ९.०० नंतर आम्ही सलामा कार्यालयात होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष दिली आहे व मी सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

**उलटतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीं क्र.३,६,१०,१२,१६,२०,२४ करीता ॲड.श्री.ए.जी.कारेमोरे यांचे मार्फत**

उलटतपास आरोपीं क्र.३,६,१०,१२,१६,२०,२४ करीता ॲड.श्री.ए.जी.कारेमोरे यांनी वरील उलटतपास सदर आरोपींकरीता ग्राहय धरण्यात यावा अशी विनंती केली ती मान्य करण्यात आली. वरील उलटतपास आरोपी क्र.३,६,१०,१२,१६,२०,२४ यांचे करीता ग्राहय धरण्यात येतो.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास काही नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत,

रामटेक
दिनांक - १४/११/२०२४

**(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट.न.२, रामटेक